# मेंढा येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिरास प्रारंभ

उस्मानाबाद : येथील व्यंकटेश महाजन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरास सोमवारी मेंढा येथे प्रारंभ झाला.

आठ जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या शिबिराचे उद्‌घाटन संस्था सचिव ॲड. मिलिंद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व रासेयो विभागाच्या विभागाच्या जिल्हा समन्वयक डॉ. शीला स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवाचे प्रशिक्षण घ्यावे तसेच विविध उपक्रमांच्या माध्यमातून व्यक्तीमत्त्वाच्या विकासासाठी मिळालेल्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. स्वामी यांनी यावेळी केले. यावेळी ॲड. मिलिंद पाटील, प्राचार्या डॉ. अनार साळुंके यांनीही मार्गदर्शन केले. प्रास्ताविक कार्यक्रम समन्वयक डॉ. मिलिंद माने यांनी केले तर डॉ. जयश्री कुलकर्णी यांनी आभार मानले. कार्यक्रमास आत्माराम मेंढेकर, अंगद माळी, दगडू सोनटक्के, शिवाजी माळी, मारुती आहिरे उपस्थित होते.